# रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)

मुख्यकचेरी : प्लॉट क्र.बीसी/१, गेट क्र.५ च्या शेजारी, पेट्रोलपंपाच्या मागे, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ४११०३७

✆ ९७३००४०१६० www.rupeebank.com ✉ gadm@rupeebank.com


जा.क्र.आरसीबी/०१/साप्र/११०बुधवार/ईलिलाव/४५८/२०२६-२७ दि.१०.०९.२०२६

### :: बँकेच्या स्वमालकीच्या स्थावर मालमत्तेच्या जाहीर ई-लिलावाची नोटीस ::

तमाम लोकांस कळविण्यात येते की, बँकेच्या स्वमालकीच्या **११०, बुधवारपेठ, पुणे ४११००२** येथील जागेचे वाजवी मूल्य/अपसेट प्राईस निश्चित करुन मिळण्याच्या बँकेच्या प्रस्तावास मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मान्यता दिली असून सदर मालमत्ता विक्रीस विक्रीपूर्व परवानगी दिली आहे. सबब सदर खाली नमूद केलेल्या वर्णनातील मिळकतीची **"जशी आहे तशी व जेथे आहे तेथे, तेथे जे काही आहे ते व कोणतीही तक्रार नाही"** या तत्त्वावर जाहीर ई-लिलावाने विक्री करण्याचे बँकेने ठरविले आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**जाहीर ई-लिलावाद्वारे विक्रीस काढलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत व अन्य माहिती :**

| स्थावर मालमत्तेचा तपशील | मंजूर वाजवी/ राखीव किंमत | बयाणा रक्कम | ई-लिलाव दस्तऐवज खर्च (जीएसटीसह) विनापरतावा |
|---|---|---|---|
| **सिटीएस नं.११०, बुधवारपेठ, मेन लक्ष्मीरोड पासून ५० फुटाच्या अंतरावर, नुतन मराठी शाळेमागे, जोगेश्वरी लेन, पुणे ४११००२**<br>क्षेत्रफळ - प्लॉट एरिया ११३४ स्क्वे.फुट व त्यावरील बांधकाम तळमजला, पहिला व दुसरा मजला प्रत्येकी ९३० स्क्वे.फुट याप्रमाणे एकूण २७९० स्क्वे.फुट बिल्टअप | ₹७,९०,००,०००/- (अक्षरी सात कोटी नव्वद लाख फक्त) | ₹७९,००,०००/- (अक्षरी एकोणऐंशी लाख फक्त) | ₹५०००/- अधिक १८% जीएसटी ₹९००/- अशी एकूण ₹५९००/- |

| :: जाहीर ई-लिलावाची तारीख व वेळ :: | :: जाहीर ई-लिलावाचे ठिकाण :: |
|---|---|
| शनिवार, दि.१७.१०.२०२६<br>वेळ : दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत | रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)<br>मुख्यकचेरी : प्लॉट क्र.बीसी/१, गेट क्र.५, पेट्रोल पंपाच्या मागे, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११०३७ |
| **ई-लिलाव पोर्टल** - www.eauction.gov.in | |

* **सदर वाजवी मूल्यामध्ये जीएसटीचा समावेश नाही. जीएसटीची आकारणी स्वतंत्ररित्या केली जाईल.**

**अटीशर्ती :**

१) वर वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेची "जशी आहे तशी, जेथे आहे तेथे, तेथे जे काही आहे ते व कोणतीही तक्रार नाही " या तत्त्वावर ई-निविदा प्रक्रिय राबवून जाहीर ई-लिलावाने विक्री करण्यात येईल.

२) जाहीर ई-लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीस/संस्थेस दस्तऐवजांची **(विनापरतावा)** जीएसटीसह किंमत ₹५९००/- (अक्षरी रुपये पाच हजार नऊशे फक्त) व बयाणा रक्कम (EMD) ₹७९.०० लाख (अक्षरी रुपये एकोणऐंशी लाख फक्त), या रकमां, 'रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)' यांच्या खालील बँक तपशीलाप्रमाणे डिमांड ड्राफ्ट/ आरटीजीएस/ एनईएफटी/ ई-पेमेंटद्वारे भरावी लागेल.

| | |
|---|---|
| Name of Beneficiary | : Rupee Coop. Bank Ltd., Pune |
| Name of the Bank | : State Bank of India |
| Name of the Branch | : Pune Main Branch, Collector Office Compound, Pune |
| Account No. | : 11099450523 [ IFSC No. SBIN0000454 ] |

*(बयाणा रक्कम व दस्तऐवज खर्च (जीएसटीसह) - दोन स्वतंत्र डीडी/आरटीजीएस/एनईएफटी/ई-पेमेंट नुसार भरणे आवश्यक आहे.)*

३) सदर रकमां ऑनलाईन भरल्याच्या स्वतंत्र पावत्या, युटीआर क्रमांक/ Transaction ID जाहीर ई-लिलावासाठी ई-निविदा अर्ज भरतेवेळी अपलोड कराव्यात.

४) जाहीर ई-लिलावाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | जाहीर ई-लिलाव प्रसिद्धी दिनांक व वेळ | १५.०९.२०२६ | सकाळी ११ वा. |
| २ | स्थावर मिळकत पाहणी कालावधी | १५.०९.२०२६ ते १४.१०.२०२६ | सकाळी ११ वा. ते दुपारी ४ वा. पर्यंत (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व बँकेस पूर्वसुचना देऊन) |
| ३ | ऑनलाईन ई-निविदा सादर करण्यासाठी मुदत दिनांक व वेळ (बयाणा रकमेसह) | १५.०९.२०२६ ते १५.१०.२०२६ | दुपारी ३ वा. पर्यंत |
| ४ | आलेल्या ई-निविदांस बँकेकडून मंजुरी देण्याचा अंतिम दिनांक व वेळ | १६.१०.२०२६ | दुपारी ३ वा. |
| ५ | जाहीर ई-लिलाव सुरू व बंद होण्याचा दिनांक व वेळ | १७.१०.२०२६ | दुपारी १२ वा. ते दुपारी ३ वा. पर्यंत परंतु ई-लिलावात भाग घेणारे व्यापारी/सहभागी खरेदीदार यांनी लावलेल्या ई-बोलीनुसार आवश्यकता भासल्यास अंतिम बोलीपर्यंत एका वेळेस ५ मिनिटे याप्रमाणे वेळ वाढविण्यात येईल. |

५) सदर ई-लिलावाद्वारे विक्री करण्याबाबतची दैनिक 'लोकसत्ता' व 'इंडियन एक्सप्रेस' या दैनिकांच्या पुणे आवृत्यांमध्ये दि.१३.०९.२०२६ रोजी जाहीरात प्रसिध्द करीत आहोत. तसेच बँकेच्या www.rupeebank.com या संकेतस्थळावर त्याचप्रमाणे बँकेच्या मुख्यकचेरीच्या व शाखा कार्यालयाच्या सूचना फलकांवर बँकेचे सभासद/ ठेवीदार व तमाम लोकांसाठी दर्शनी भागात प्रसिध्द करण्यात येईल.

६) बँकेकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेली मिळकत इच्छुक खरेदीदारांना खालील पत्त्यावर समक्ष येऊन पाहता येईल.

| मिळकत पाहणीसाठी दिनांक व वेळ | मिळकतीचे ठिकाण |
|---|---|
| दि.१५.०९.२०२६ ते दि.१४.१०.२०२६ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व बँकेस फोनवरुन पूर्वसूचना देऊन) | सिटीएस नं.११०, बुधवारपेठ, मेन लक्ष्मीरोड पासून ५० फुटाच्या अंतरावर, नुतन मराठी शाळेमागे, जोगेश्वरी लेन, पुणे ४११००२ |



RUPEE CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE PUNE

७)	कोणत्याही परिस्थितीत धनादेश स्विकारले जाणार नाहीत. ज्या सहभागी खरेदीदार/व्यक्तीने बयाणा रक्कम व ई-लिलाव दस्तऐवज खर्च (जीएसटीसह) या रकमां बँकेस विहित मुदतीत भरल्या असतील तसेच आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली असेल, त्यांनाच ई-लिलावात सहभाग घेण्यासाठी पात्र करण्यात येईल व जाहीर ई-लिलावात भाग घेता येईल.

८)	ई-निविदा प्रक्रिया निविदाधारकांच्या virtual/आभासी उपस्थितीत www.eauction.gov.in या संकेतस्थळावर पार पाडली जाईल. वाजवी मुल्यांकनापेक्षा अधिक बोली लावणाऱ्या सर्व निविदाधारकांना स्पर्धात्मक दराने ऑनलाईन संधी उपलब्ध करुन देऊन ई-लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

९)	जाहीर ई-लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीने ई-लिलावाच्या वेळी स्वतःचे पॅनकार्ड, आधारकार्ड अपलोड करावे. संस्था असल्यास, संस्था नोंदणी दाखला, पत्त्याचा पुरावा, संस्थेचे पॅनकार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट लायसेन्स, प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीचे अधिकार पत्र, केवायसी इत्यादी कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करावीत.

१०)	अवसायक अथवा प्राधिकृत अधिकारी, रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात) यांच्या मते वाजवी किंमत न आल्यास, कोणतीही बोली न आल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव, सदर जाहीर ई-लिलाव पुढे ढकलण्याचा अथवा तहकूब करण्याचा अधिकार अथवा पुरेशा कारणास्तव सर्वाधिक बोली नाही आली तर नाकारण्याचा अधिकार अवसायक अथवा प्राधिकृत अधिकारी, रुपी को-ऑप. बँक लि., पुणे यांना राहील.

११)	जाहीर ई-लिलावामध्ये वाजवी किंमतीपेक्षा कमी रकमेची ई-निविदा स्विकारली जाणार नाही.

१२)	अधिकतम ई-निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचा निर्णय व अधिकार अवसायक अथवा प्राधिकृत अधिकारी, रुपी को-ऑप. बँक लि., पुणे यांना राहील व त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

१३)	**तथापि ई-लिलाव प्रक्रियेतील दोन बोलीमधील फरकाची रक्कम किमान ₹१.०० लाख (अक्षरी रुपये एक लाख फक्त) किंवा त्यापटीत असणे बंधनकारक राहील.**

१४)	जाहीर ई-लिलाव प्रक्रियेच्या वेळेस काही तांत्रिक कारणास्तव अडचण निर्माण होऊन ई-लिलाव रद्द करणे भाग पडल्यास, ई-लिलावाची पुढील तारीख व वेळ तसेच सदर ई-लिलावासंदर्भातील आवश्यक ती माहिती बँकेच्या www.rupeebank.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच अंतिम लिलाव प्रकियेत सहभागी झालेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांचे ईमेलवर/मोबाईलवर त्याबाबत कळविण्यात येईल.

सदर ई-लिलाव प्रकियेबाबत लिलावात सहभाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना काही माहिती आवश्यक असल्यास त्यांनी बँकेच्या admin@rupeebank.com या ईमेलवर किंवा श्री.प्रविण जोशी, व्यवस्थापक, प्रशासन विभाग (भ्रमणध्वनी क्र.९७३००४०१६०) यांना संपर्क साधावा.

१५)	ई-लिलावात सर्वाधिक बोलीधारकाने त्याच्या अंतिम खरेदी रकमेच्या स्विकारलेल्या बोलीच्या १५% रक्कम ई-लिलावाच्या दिवशी त्याच तारखेच्या डिमांड ड्राफ्ट (धनाकर्ष) 'रुपी को-ऑप. बँक लि., पुणे' या नावे देणे किंवा ती रक्कम ई-पेमेंटद्वारे रुपी बँकेच्या वर नमूद केलेल्या बँक खात्यात त्याच दिवशी भरणे आवश्यक आहे. तथापि सदरची रक्कम जमा करताना कांही तांत्रिक समस्या/अडचण निर्माण झाल्यास अवसायक यांचा निर्णय अंतिम असेल.



RUPEE CO-OP. BANK HEAD OFFICE PUNE

कोणत्याही परिस्थितीत चेक(धनादेश) स्विकारले जाणार नाहीत. निविदा सादर करताना बोलीधारकाने जमा केलेली बयाणा रक्कमेव्यतिरिक्त सदरची १५% रक्कम भरणे आवश्यक आहे. **त्यासाठी रुपी बँकेस "Registered Beneficiary" म्हणून नोंद होण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना / दक्षता लिलावधारकांनी त्यांचे स्तरावर करुन घ्याव्यात.**

ई-लिलावाच्या दिवशी सदरची १५% रक्कम, तांत्रिक कारण सोडून अन्य कांही कारणास्तव रुपी बँकेच्या बँकखात्यात जमा न केल्यास व अशा परिस्थितीत सर्वोच्च बोलीदार अपात्र ठरवून, त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल तसेच ई-लिलावात विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेवर व भरलेल्या बयाणा रकमेवर लिलाव खरेदीदाराचा हक्क राहणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही. सबब द्वितीय क्रमांकाच्या बोलीदाराची बोली स्विकारणे अथवा फेरलिलाव जाहीर करणे याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार अवसायक यांचा असेल.

१६) तसेच भरणा केलेली बयाणा रक्कम ₹७९.०० लाख (अक्षरी एकोणऐंशी लाख फक्त) अधिक अंतिम बोलीच्या १५% रक्कम वजा जाता, उर्वरित रक्कम व एकूण खरेदी रक्कमेवरील नियमानुसार जीएसटी रक्कम याप्रमाणे संपूर्ण रक्कम लिलावाच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांचे आत संबंधित यशस्वी ई-बोलीधारक/निविदाकाराने डिमांडड्राफ्ट(धनाकर्ष)/ई-पेमेंटद्वारे बँकेत जमा करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत धनादेश/चेक स्विकारले जाणार नाहीत. **सदरचा लिलाव मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मंजुरीचे अधिन राहून कायम करण्यात येईल.**

१७) तथापि, विहित मुदतीत सदर रक्कम जमा न झाल्यास बयाणा रक्कम ₹७९.०० लाख (अक्षरी एकोणऐंशी लाख फक्त) व प्राप्त १५% रक्कम जप्त होईल व या जप्त केलेल्या रकमेवर आणि बँकेच्या स्वमालकीच्या संबंधित ई-लिलावात विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेवर लिलाव खरेदीदाराचा हक्क राहणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

१८) तथापि ज्या निविदाकारांची बोली मंजूर होणार नाही, त्यांची बयाणा रक्कम संबंधितांना त्वरीत परत करण्यात येईल. बयाणा रकमेवर कोणतीही व्याज दिले जाणार नाही. तसेच दस्तऐवज खर्च परत दिला जाणार नाही.

१९) जाहीर ई-लिलाव खरेदीदाराने लिलाव खरेदी केल्याच्या १५% रक्कम व उर्वरित ८५% रक्कम भरल्यावर सदर प्रस्ताव मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात विक्री निश्चितीची मंजुरी घेण्यासाठी पाठवावा लागतो. सदर मंजुरीस ६० दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता असते. त्यामुळे विलंब लागल्यास खरेदीदार अथवा अन्य व्यक्तीस/संस्थेस तक्रार करता येणार नाही व भरलेल्या रकमेवर बँकेकडून दरम्यानच्या काळात कोणतेही व्याज/नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

२०) उपरोक्त स्थावर मालमत्तेवरील ग्रामपंचायत/महानगरपालिका/मालमत्ता कर, वीज बील, पाणी पट्टी, एन.ए.टॅक्स (अकृषिक कर), लोकल फंड, सेल्स टॅक्स (विक्री कर), आयकर (उत्पन्न कर), एक्साईज कर, तगाई, शेतसारा, ले-आऊट/मोजणी/टाऊन प्लॅनिंग चार्जेस, सोसायटी वर्गणी व इतर खर्च, ट्रान्सफर चार्जेस इ. शासकीय वा निमशासकीय खर्च इत्यादीची माहिती ई-लिलाव खरेदीदाराने स्वत: तपासून घेऊन भरावयाचा/करावयाचा आहे.

२१) ज्या व्यक्ती किंवा संस्था यांच्या नावाने लिलाव मंजूर होईल, त्या व्यक्ती किंवा संस्थेस अंतिम ई-लिलाव बोली रकमेच्या भरावा लागणारा आयकर कायद्यानुसारचा टीडीएस (Tax Deducted at Source) अथवा जीएसटी (Goods & Service Tax) हा स्वतंत्रपणे ई-लिलाव रकमेव्यतिरिक्त संबंधित व्यक्ती किंवा संस्थेस वेगळा भरावा लागेल. त्याची जबाबदारी रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात) यांच्यावर राहणार नाही याची नोंद घ्यावी.



RUPEE CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE PUNE

२२) सदर अंतिम बोलीची संपूर्ण रक्कम जीएसटीसह बोलीदाराने विहित मुदतीत बँकेत भरणा केल्यानंतर व सदर सर्वोच्च बोलीचा ई-लिलाव मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कायम केल्यानंतरच आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणे, खरेदीखत करणे व ते नोंदणीकृत करणे याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदरची मालमत्ता बोलीदारास हस्तांतरित करण्यात येईल.

२३) सदर हस्तांतरण करण्यासाठी बँकेच्या वकीलांच्या सल्ल्याने खरेदी कराराचा मसुदा तयार करण्यात येईल व दोन्ही पक्षांनी तो अंतिम केल्यानंतर त्याची रितसर नोंदणी सब-रजिस्ट्रार कार्यालयात करण्यात येईल. सदर खरेदी कराराचे नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क व तदअनुषंगिक खर्च अदा करण्याची जबाबदारी संबंधित खरेदीदाराची राहील. वकील फीचा खर्च बँक व खरेदीदार यांनी समसमान प्रमाणात करावयाचा आहे.

२४) **वरीलप्रमाणे अंतिम बोली ई-निविदा प्रक्रिया राबवून पूर्ण झाल्यानंतर त्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव बँकेकडून मा.निबंधक तथा मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठविण्यात येईल. त्यांचे मान्यतेनंतरच लिलाव कायम करणेत येईल. तोपर्यंत सदर मालमत्तेचा ताबा बँकेकडे राहील.**

२५) दरम्यानच्या काळात भरलेल्या रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही, तसेच नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांची मंजुरी प्राप्त होताच व वरीलप्रमाणे अंतिम बोली रक्कम अधिक त्यावरील जीएसटी रक्कम याप्रमाणे संपूर्ण रक्कम बँकेत जमा असल्याची खात्री करुन अंतिम लिलाव कायम करण्यात येईल. याबाबत रोजनामा करण्यात येईल व त्यावर बँकेच्यावतीने सहया करण्याचे अधिकार संयुक्तपणे श्री.संजय सावंत-सरव्यवस्थापक, श्री.प्रविण जोशी-व्यवस्थापक-प्रशासन विभाग व श्री.श्रीनिवास कुलकर्णी-व्यवस्थापक-हिशोब विभाग यांना राहतील. त्यावर अंतिम बोलीदार व/त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचीही सही घेण्यात येईल.

२६) सदर जाहीर ई-लिलावाबाबत खरेदीदार, ई-लिलावात भाग घेणारे अथवा इतर कोणाकडूनही काही न्यायालयीन/कायदेशीर वाद निर्माण झाल्यास/केल्यास पुणे येथील न्यायालयीन कक्षेत मर्यादित राहील व त्याचा होणारा खर्च नुकसान भरपाईसह संबंधितांकडून वसूल केला जाईल.

२७) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतूदी जाहीर ई-लिलाव खरेदीदारावर व जाहीर ई-लिलावात भाग घेणाऱ्यावर बंधनकारक राहतील.

२८) वरीलप्रमाणे संपूर्ण खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्यवाहीबाबतचा अहवाल मा.सहकार आयुक्तालयास सादर करण्यात येईल.

स्थळ : पुणे

दिनांक : १०.०९.२०२६

**सरव्यवस्थापक** **अवसायक**

रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)

RUPEE CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE PUNE